महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, पुणे ४११००५

Maharashtra State Board Of Secondary &
HIGHER SECONDARY EDUCATION PUNE 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 /
25536712(OFF)

FAX- 020/25536761
E-MAIL sscboardpune@gmail.com

जा.क्र.पुविमं/उमा-अ/क्रीडा/मार्च२६ 1874
पुणे ४११ ००५
दिनांक 28/02/२०२६

प्रति,
सर्व मुख्याध्यापक / प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त शाळा/क.म.विद्या.
पुणे, अहिल्यानगर, सोलापूर

**विषय-** फेब्रु-मार्च २०२६ इ१० वी व १२ वी परीक्षेस प्रविष्ठ होणा-या खेळाडू विद्यार्थ्यांचे क्रीडा सवलतीचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करणेबाबत..
**संदर्भ-** क्र.रा.मं/परीक्षा-७/९०९ दि.२६.०२.२०२६

फेब्रु-मार्च २०२६ इ१० वी व १२ वी परीक्षेस प्रविष्ठ होणा-या खेळाडू विद्यार्थ्यांचे क्रीडा सवलतीचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करण्याकरीता सोबत जोडलेल्या संदर्भीय राज्य मंडळ कार्यालय प्रकटनाची नोंद घेऊन ऑनलाईन पध्दतीने URL: https://aaplesarkar.mahonline.gov.in या लिंकद्वारे अर्ज भरुन जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे दि.१५.०४.२०२६ पर्यंत पाठवायचे आहेत. त्यानंतर मुदतवाढ दिली जाणार नसून तद्नंतर कोणाचेही ऑफलाईन प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. प्रस्ताव सादर करताना काही अडचणी आल्यास पोर्टलवरील टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा व क्रीडा गुण प्रस्ताव सादर करणेसंदर्भात काही अडचण आल्यास क्रीडा अधिकारी यांचेशी संपर्क साधावा.

MBRaut
27.2.26
(डॉ.मीनाक्षी राऊत)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे- ४११ ००५



e:\vandana more\vandana more\letters vandana.docx

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न.८३२ ए, फा.प्लॉ.नं.१७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

जा. क्र.रा.मं./परीक्षा-७/९०९
पुणे - ४११००४
दिनांक - २६/०२/२०२६

प्रति,

१) मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०००३२
२) मा. विभागीय प्रसिध्दी उपसंचालक,पुणे/नागपूर/ छत्रपती संभाजीनगर/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण
३) मा. संचालक,दूरदर्शन केंद्र,वरळी,मुंबई-४०००३०
४) मा. संचालक,आकाशवाणी,मुंबई केंद्र, नवीन प्रसारण भवन, बॅकबे रेक्लेमेशन, आमदार निवासाजवळ, मुंबई-४०००२०
५) मा .संचालक,आकाशवाणी केंद्र
पुणे/नागपूर/ छत्रपती संभाजीनगर /मुंबई/जळगांव/रत्नागिरी/सांगली/कोल्हापूर/सातारा/सोलापूर/नाशिक
६) मा. संपादक, सर्व वृत्तपत्र/ वृत्तवाहिन्या
७) सर्व जिल्हा प्रसिध्दी अधिकारी

**विषय:-** फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांचे क्रीडा सवलतीचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करणेबाबत

महोदय,

फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांचे क्रीडा सवलतीचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करणेबाबतचे प्रकटन सोबत जोडले आहे.

सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रानी त्यांच्या वृत्तपत्रात/ प्रादेशिक बातम्यांचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

Mali

(डॉ.दिपक माळी)
सचिव
राज्य मंडळ, पुणे.

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-

१) विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे/नागपूर/ छत्रपती संभाजीनगर /मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण विभागीय मंडळ,
पुणे/नागपूर/ छत्रपती संभाजीनगर /मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/रत्नागिरी यांनी स्थानिक स्तरावर प्रकटन प्रसिध्द करावे व सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावे.
२) व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ,पुणे
३) अस्वीस व सस्वीस राज्यमंडळ, पुणे ४) ऑनलाईन विभाग

प्रत माहितीसाठी सविनय सादर-

१) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
२) मा. आयुक्त शिक्षण, शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## !!प्रकटन!!

विषय :- फेब्रुवारी–मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांचे क्रीडा सवलतीचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करणेबाबत.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेशी संलग्न असलेल्या सर्व माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व पालक यांना सूचित करण्यात येते की, शासन निर्णय क्रमांक – उमाशि–२०१५/प्र.क्र.२६२/एस.डी.२ , दिनांक २० डिसेंबर २०१८ नुसार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना व एन.सी.सी., स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे गुण देण्यात येतात.

सदर शासन निर्णयानुसार जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडून क्रीडा प्रस्ताव तसेच एन.सी.सी. स्काऊट गाईड इत्यादी प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून दरवर्षी विभागीय मंडळाकडे सादर केले जातात.

त्याअनुषंगाने फेब्रुवारी – मार्च २०२६ च्या इ.१० वी व इ.१२ परीक्षेस प्रविष्ट खेळाडू विद्यार्थ्यांचे प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी दि. १५/०४/२०२६ पर्यंत संबंधित विभागीय मंडळाकडे आपले सरकार पोर्टलव्दारे ऑनलाईन पध्दतीने पाठवावयाचे आहेत.

तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड चे प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी विभागीय मंडळांकडे प्रचलित पध्दतीने दि. १५/०४/२०२६ पर्यंत पाठवावयाचे आहेत.

याबाबत सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी, सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये मुख्याध्यापक/प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी, पालक, व सर्व संबंधित घटकांनी उपरोक्त बाबींची नोंद घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

दिनांक २६/०२/२०२६

(डॉ.दिपक माळी)
सचिव
राज्यमंडळ, पुणे-४

G:\Prakatn Kheladu prastav 2026.docx-2